जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते किँ खालील परिशिष्टात नमूद मिळकतीचे सुरेश हरिराम पठारे व श्री सत्यवान हरिराम पठारे दोघेही राहणार मौजे चरोली तालुका हवेली जिल्हा पुणे. मालक असून सदर मिळकत त्यांच्या ताबे वहिवाटीत आहे. सदर मिळकत एकत्रितपणे विकसन करण्यासंदर्भात आमचे अशील व सदर विद्यमान मालक यांचे दरम्यान अटी व शर्ती ठरल्या आहेत. तरी सदर मालकांनी आमच्या अशिल यांना सदर मिळकतीतील त्यांचे हक्क निर्वेध, निजोखमी, असून इतर अन्य कोणाचेही कोणत्याही प्रकारचा बोजा, लीन, लीज, दान, दस्त, बक्षीस, साठेखत, कुलमुखत्यारपत्र, करारनामा नाही असे आश्वासन वरील विद्यमान मालकांनी आमचे अशीलांना दिले आहे. जर इतर कोणाचाही सदर मिळकती संदर्भात कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसांच्या आत त्यासंबंधित मूळ कागदपत्रांनिशी येऊन आमची खात्री करून द्यावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचे विकसन करतील व नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही अशी जाणीव तमाम लोकांना देण्यात येत आहे.

परिशिष्ट

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील गाव मौजे चरोली बुद्रुक येथील सर्वे नं. ३०१ यासी एकूण क्षेत्र ०५ हे ९८ आर पैकी क्षेत्र वरील विद्यमान मालकांच्या मालकी वाहिवाटीचे १ हे २० आर ही मिळकत त्यासी चतुर्सिमा खालील प्रमाणे :

पूर्वेस : सर्वे नं.३०१ पैकी उर्वरित क्षेत्र
दक्षिणेस : सर्वे नं..३०१ पैकी उर्वरित क्षेत्र
पश्चिमेस : ३० मी रुंद रस्ता
उत्तरेस : सर्वे नं..३०१ पैकी उर्वरित क्षेत्र

पुणे
दिनांक : २१ /२/२०२५

सुरेखा किंकर
ऍडव्होकेट
कुंदन चेम्बर्स, टुबे पार्क, शिवाजीनगर ४११००५

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत हि शकुंतला अपार्टमेंट कंडोमिनीयम, पत्ता जुना सर्व्हे नं ८४, सव प्लॉट नं. २, फायनल प्लॉट नं. ७, सिटीएस नं २११/२, सदाशिव पेठ, पुणे यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर शकुंतला अपार्टमेंट कंडोमिनीयम मधील खाली परिशिष्टात नमूद केलेल्या सर्व मालकांनी त्यांचे सदर मिळकतीमधील असलेला अविभक्त हिस्सा व त्यांच्या मालकी वहिवाटीचे फ्लॅट व सदर जमिनीचे पुर्नविकास हक्क हे आमचे अशिलांचे लाभात तबदिल करण्याचे मान्य केले असून सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची खात्री व भरवसा सदर मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोजा, खरेदी, विक्री, गहाण, वारसा हक्क, दान, बक्षीस, साठेकरार, विकसन करार, लीज, पोटगी, कुलमुखत्यार, तावेदार, वगैरे स्वरूपाचा हक्क अगर अधिकार, हितसंबंध असल्यास संबंधितांनी परंतुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१० (दहा)** दिवसांचे आत आम्हास आमचे खालील पत्त्यावर आपली लेखी हरकत कळवावी व त्यासंबंधी सर्व मूळ कागदपत्रांनिशी शावीत करून आमची खात्री पटवून दयावी, अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे. असे समजून त्यावर कोणाचाही कसलाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध राहिलेला नाही व असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे गृहीत धरून आमचे अशील सदर मिळकतींचा पुढील व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचीही कसलीही कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट : तुकडी पुणे, पोट तुकडी ता. हवेली, जि. पुणे तसेच मे. सब रजिस्ट्रारसाहेब हवेली क्र. १ ते २८ यांचे हददीतील तसेच पुणे महानगरपालिका यांचे कार्यक्षेत्रातील गाव मौजे सदाशिव पेठ, येथील सिटीएस नं २११/२, जुना सर्व्हे नं ८४, सव प्लॉट नं. २, फायनल प्लॉट नं. ७, यांसी क्षेत्र ५६१६ चौ.फुट (५२१.५४ चौ.मीटर) यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे :

पूर्वेस : सिटीएस नं १९७, पश्चिमेस : सिटीएस नं २११ मधील प्लॉट नं ०३,
दक्षिणेस : रामबाग सोसायटी आणि रोड, उत्तरेस : सिटीएस नं २११ मधील प्लॉट नं ०१ आणि २०' रोड,

यावर बांधण्यात आलेल्या या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या शकुंतला अपार्टमेंट कंडोमिनीयम या इमारतीमधील एकूण १० अपार्टमेंट

अ. क.	अपार्टमेंट धारकाचे नाव	अपार्टमेंट नं.
१.	श्री. मिलिंद शंकर संत, कु. अरूणा शंकर संत, कु. अश्विनी शंकर संत	१
२.	सौ. सुपिया शाम घटे, श्री. शाम परशुराम घटे	२
३.	श्री. मिलिंद शंकर संत, कु. अरूणा शंकर संत, कु. अश्विनी शंकर संत	३ आणि ४
४.	श्री. अविनाश एकनाथ जगदाळे	५
५.	श्री. दिनकर रघुनाथ कोल्हटकर, सौ. आराधना दिनकर कोल्हटकर	६
६.	श्री. क्षितीज रमेश पाटुकले, सौ. स्नेहल क्षितीज पाटुकले	७
७.	श्री. आशुतोष पदिप देवधर, सौ. प्राजक्ता आशुतोष देवधर	८
८.	श्री. प्रशांत सदाशिव कोळेकर, सौ. अपर्णा प्रशांत कोळेकर	९
९.	श्री. प्रदिप माधव देवधर, सौ. अनघा प्रदिप देवधर	१०

दि. १३/०३/२०२५

ॲडव्होकेट किरण काबरा,
चिंतामणी, दुसरा मजला, अद्वैत नगर, पौड रोड, कोथरूड, पुणे - ३८.
मो. ९७६५४०९८०१ Email: kabra.kiran09@gmail.com

परिशिष्ट -IV-A अचल मालमत्तेची ई-लिलाव विक्री सूचना

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल असेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय :- 9 वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली - 110001, फोन्स :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब. :- **www.pnbhousing.com**
कोल्हापूर शाखा: 401/402, चौथा मजला, मातोश्री प्लाझा, व्हीनस कॉर्नर, शाहूपुरी, कोल्हापूर, महाराष्ट्र- 416001. **खराडी शाखा:** तिसरा मजला, गणलक्ष्मी कॉम्प्लेक्स, सर्व्हे क्र. 08, हडपसर खराडी बायपास रोड, खराडी, पुणे, महाराष्ट्र- 411014. **कोंढवा शाखा:** 560, पाचवा मजला, मार्वल व्हिस्टा, स. क्र. 599ए - 598 + 593ए, सहानी सुजन पार्क, लुल्ला नगर, पुणे, महाराष्ट्र- 411040. **पिंपरी चिंचवड शाखा:** कार्यालय क्र. 302, तिसरा मजला, घेवाला कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, चिचवड, पुणे, महाराष्ट्र- 411019.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भाग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकारयांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ - सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **"जशी आहे जेथे आहे"** आणि **"जशी आहे जे काही आहे"** आणि **"तेथे जे काही आहे"** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.
याद्वारे ही सूचना सद दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार/ कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे/न्यायालयीन कब्जे (के)
NHL/KOP/0918/579743, शाखा : कोल्हापूर, समीर उत्तमराव काळे / सुप्रिया उत्तमराव काळे / मीनाक्षी समीर काळे	रु. 25328864.35 दि. 17-11-2021 रोजी नुसार	प्रत्यक्ष ताबा	प्लॉट क्र. 17 ए प्लॉट क्र. 16 सी एस क्र. 511 ए, ई वॉर्ड, लक्ष्मणराव मोहिते कॉलनी कदमवाडी रोड, कदमवाडी, डीवाय पाटील हॉस्पिटल जवळ, कोल्हापूर महाराष्ट्र- 416012, भारत.	रु. 21573000	रु. 2157300	27-03-2025	रु. 50,000	18-03-2025 रोजी दु. 12:00 ते दु. 04:00 दरम्यान	28-03-2025 रोजी दु. 02:00 ते दु. 03:00 दरम्यान	ज्ञात नाही
HOU/KRDI/0518/529344, शाखा: खराडी, विनोदसिंग छोटासिंग परदेशी/ श्रुतिशिका परदेशी / विनायकसिंग छोटेसिंग परदेशी	रु. 3157581.59 दि. 27-08-2022 रोजी नुसार	प्रत्यक्ष ताबा	सिगल बिल्डिंग, पहिला मजला, 101, गुरु विहान, गट क्र. 234, पुणे- 412207, प्रभुराम नगर फुलमळा रोड, पुणे, महाराष्ट्र- 412207, भारत.	रु. 1568000	रु. 156800	27-03-2025	रु. 10,000	17-03-2025 रोजी दु. 12:00 ते दु. 04:00 दरम्यान	28-03-2025 रोजी दु. 02:00 ते दु. 03:00 दरम्यान	ज्ञात नाही
HOU/KNDW/1018/597038, शाखा : कोंढवा, देवेंद्र राजू गायकवाड / राजू रामचंद्र गायकवाड	रु. 2390626.55 दि. 17-11-2021 रोजी नुसार	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट क्र. 201, स. क्र. 115 2, 2रा मजला, गोकुळधाम रेसिडेन्सी, चोवीसवाडी, पुणे, महाराष्ट्र- 412105, पुणे, भारत.	रु. 1234000	रु. 123400	27-03-2025	रु. 10,000	21-03-2025 रोजी दु.12:00 ते दु. 04:00 दरम्यान	28-03-2025 रोजी दु. 02:00 ते दु. 03:00 दरम्यान	ज्ञात नाही
HOU/PM/0317/370996 / HOU/PM/0317/364775, शाखा : पिंपरी चिंचवड, संजय शेषराव येवतकर / अरुणा संजय येवतकर	रु. 498055.02 / 303807.99 दि. 17-10-2019 रोजी नुसार	प्रत्यक्ष ताबा	309, तिसरा मजला, गट क्र. 4595 (जुना) गट 455 456 (नवीन), विंग ओ 1, स्वप्न नगरी, गाव- चाकण, ता. खेड, पुणे, महाराष्ट्र, भारत, 410501. (525 चौ. फुट बिल्टअप)	रु. 919000	रु. 91900	27-03-2025	रु. 10,000	19-03-2025 रोजी दु. 12:00 ते दु. 04:00 दरम्यान	28-03-2025 रोजी दु. 02:00 ते दु. 03:00 दरम्यान	ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. **(1)** आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही. **(2)** संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. **(3)** कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रक्कमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा देवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. **(4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** हे प्राधिकृत अधिकारयांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्रमांक 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com, मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्यासी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती **पंकज तिवारी/नीलाक्षी पाटील,** संपर्क क्र.: 1800 120 8800, यांचेशी संपर्क साधावा किंवा **www.pnbhousing.com** येथे भेट द्यावी.

ठिकाण :- पुणे, दिनांक : 13.03.2025

प्राधिकृत अधिकारी, मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

ताबा नोटीस (सेक्शन १३(४))

केनरा बैंक Canara Bank — सिंडिकेट Syndicate

क्षेत्रीय कार्यालय II : स. नं. ४३६, ३ रा मजला, सुखवाणी बिझनेस हब, नाशिक फाटा मेट्रो स्टेशनजवळ, कासारवाडी, पुणे-४११०२६ मोबा. : ९४०६८८००४७, ८०५५८११८७६

जसे की, खाली सही करणार **कॅनरा बँकेचे** अधिकृत अधिकारी यांनी त्यांना दि सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२, (२००२ चा ॲक्ट ५४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रुल्स २००२ चा सेक्शन १३(१२) आणि रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन खालील कर्जदार/जामीनदार त्यांच्या नावापुढे नमूद केलेल्या तारखेला मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी खाली नमूद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करावी. कर्जदार/गहाणदार रक्कम परत करण्यास असफल ठरल्याने कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३ (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स् २००२ चा रूल ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन खाली नमूद केलेल्या मालमत्तांचा सदर नमूद तारखेला **ताबा घेतला आहे.**
विशेषकरुन कर्जदार/गहाणदार आणि सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तांसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. असा व्यवहार केल्यास तो **कॅनरा बँक** यांना खालील तक्त्यात नमूद केलेल्या, येणे असलेल्या रकमा आणि त्यावरील व्याज यांच्या अधीन राहील.
सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

अ. क्र.	शाखा/कर्जदार व जामीनदाराचे नाव	गहाण मालमत्तेचा तपशील	येणे रक्कम (रु).	मागणी नोटीसीची तारीख / ताबा घेतल्याची तारीख
१	**शाखा : पिंपरी वाघिरे (१५३५४) कर्जदार : मे. टॉपव्हिजन इंजिनिअरींग इंडिया प्रा. लि. संचालक : हरी दत्तात्रय शिंदे आणि पंकज भगतलाल पटेल यांच्यामार्फत**	पुढील बंगला/रो हाऊस चे समतुल्य गहाणखत- घराचे क्षेत्रफळ २३६९ चौ. फू म्हणजेच २२०.१६ चौ. मी., टॉप टेरेसचे क्षेत्रफळ ६४० चौ. फू., गार्डनचे क्षेत्रफळ ७८० चौ. फू. एकूण विक्रीयोग्य बांधकाम क्षेत्रफळ २७८९ चौ. फू. सब प्लॉट नं. ए४ वर बांधण्यात आलेली, प्लॉट नं. ८४+९९ मधील कल्चर क्रेस्ट प्रोजेक्ट, सेक्टर नं. ६, पीसीएनटीडीए,गाव मोशी तालुका हवेली जिल्हा पुणे येथे. श्री हरी दत्तात्रय शिंदे यांच्या नावावर, जमीनीच्या **चतु:सीमा : पूर्वेस :** १५ मीटर रुंद रस्ता, **पश्चिमेस :** प्लॉट नं. ८४+९९, **दक्षिणेस :** ४५ मीटर रुद रस्ता, **उत्तरेस :** मोकळी जागा, **टायटल होल्डरचे नाव : श्री. हरी दत्तात्रय शिंदे**	**रु. २,९९,४९,१७९.८६ (रु. दोन कोटी नव्याण्णव लाख एकोणपन्नास हजार एकशे एकोणऐंशी आणि पैसे शहाऐंशी फक्त) अधिक त्यावरील जमा व्याज**	३०/१२/२०२४ / १०/०३/२०२५
२	**शाखा : शिरुर (डिपी-०२५८२) सौ. मेहरुनिसा रफिक पटेल**	फ्लॅट नं. ००२ चा सर्वसामाईक भाग- क्षेत्रफळ ५३.९० चौ. मी. तळ मजला येथील दोन चाकी पार्किंगसहीत, क्लासिक अपार्टमेंट स्कीम, प्लॉट नं. ५ए व ५बी वर बांधण्यात आलेला, सर्व्हे नं. २८०/३ जोशीवाडा/ शिरुर बायपास परिसर येथे स्थित, शिरुर नगर पालिका परिषद आणि उपनिबंधक, शिरुर, ता शिरुर, जिल्हा पुणे यांच्या हद्दीत, **चतु:सीमा : पूर्वेस :** मोकळी जमीन, **दक्षिणेस :** बाजूची जागा, **पश्चिमेस :** पार्किंग व जिना, **उत्तरेस :** फ्लॅट नं. ००१ **टायटल होल्डरचे नाव : सौ. मेहरुनिसा रफिक पटेल**	**रु. २५,४७,१२४.८६ (रु. पंचवीस लाख सत्तेचाळीस हजार एकशे चोवीस आणि पैसे शहाऐंशी फक्त) अधिक त्यावरील जमा व्याज**	३१/१२/२०२४ / ११/०३/२०२५

दिनांक : १०/०३/२०२५, ११/०३/२०२५
स्थळ : पुणे

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

अधिकृत अधिकारी,
कॅनरा बँक

दि लातूर अर्बन को-ऑप. बँक लि.,लातूर

पत्ता : स्व.रामगोपालजी राठी व्यापारी संकुल, शिवाजीनगर, लातूर - ४१३५३१
फोन क्र. - (02382) 259503, फॅक्स - 02382- 255235,
ईमेल : info@laturbank.co.in, वेबसाईट : www.laturbank.co.in

संदर्भ क्र.: LUCB/AO/14-LTL-47/2024-25/140 **अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलावासाठी जाहीर सूचना, बयाणा रक्कम व** दिनांक : १२/०३/२०२५

कागदपत्रे (ऑनलाईन) सादर करण्याची शेवटची दिनांक व वेळ २७ मार्च, २०२५ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत दि लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. लातूर यांचेकडे तारण असलेल्या अचल मालमत्तांची विक्री.

ज्याअर्थी, दि लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. लातूर च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे दि लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.ची थकबाकी अधिक व्याजाच्या वसुलीसाठी खालील कर्ज खात्यांमध्ये सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) निमय, २००२ मधील अनुच्छेद १३(२) अंतर्गत पाठविलेल्या सूचनेच्या अनुषंगाने खालील मालमत्तांच्या त्यांची **"जशी आहे जेथे आहे आणि जशी आहे ते काही आहे"** आणि **"तेथे जे काही आहे"** तत्वावर खालील कर्ज खात्यांची विक्री करण्याच्या अधिकारासह **सांकेतिक ताबा** घेतलेला असून सदर थकबाकीचा भरणा न केल्याने निम्नस्वाक्षरीकरांनी सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(४) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत सदर मालमत्तांची विक्री करून बँकेची थकबाकी वसुल करण्याचे ठरविले आहे. सदर विक्री ही निम्नस्वाक्षरीकरांद्वारे **(https://sarfaesi.auctiontiger.net)** या वेब पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून घेण्यात येईल.

अचल मालमत्तांचे वर्णन

अ. क्र.	शाखेचे नाव व खाते क्र.	कर्जदाराचे नांव व संपत्तीधारकाचे नाव	मालमत्तेचे वर्णन	रक्कम,मागणी सूचना दिनांक आणि ताबा दिनांक	राखीव किंमत / बयाणा रक्कम / बोली वाढ रक्कम	ई-लिलावाची दिनांक / वेळ
१	दि लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,लातूर शाखा : उरूळी कांचन खाते क्र.: एलटीएल-४७	मे.मे.देव असोसिएटस्, प्रोप्रा.समीर मधुकर देवकर मालमत्ताधारकाचे नांव: श्री.समीर मधुकर देवकर	**मौजे उरूळी कांचन, ता.हवेली, जि.पुणे येथील गट क्र.१०८२ आणि १०८३ बांधण्यात आलेल्या 'तारांगण नक्षत्र को-ऑप.हाऊसिंग सोसायटी लि.' यातील इमारत नामे 'तारांगण नक्षत्र' मधील पाचव्या मजल्यावरील फ्लॅट क्र.ए-५०१, एक बंदिस्त कार पार्किंग सहीत, चटई क्षेत्रफळ ३७४.४४ चौ.फुट म्हणजेच ३४.८० चौ.मी., सलग्न बाल्कणी क्षेत्रफळ ४३.५७ चौ.फुट म्हणजेच ४.०५ चौ.मी., ड्राय बाल्कणी क्षेत्रफळ २३.२४ चौ.फुट म्हणजेच २.१६ चौ.मी., आणि सलग्न टेरस क्षेत्रफळ ४५.१९ चौ.फुट म्हणजेच ४.२० चौ.मी.,** ज्याची चतु:सिमा. **पुर्वेस** : पॅसेज आणि डक्ट **पश्चिमेस** : डक्ट **दक्षिणेस** : स.नं.४९/३/२ (उर्वरित भाग) **उत्तरेस** : पॅसेज / फ्लॅट क्र.५०८	दिनांक २८/०२/२०२५ पर्यंतची रक्कम **रू. १५,४४,५९५.५२** मागणी सूचना दिनांक **११/१०/२०२४** सांकेतीक ताबा दि.०८/०१/२०२५	राखीव किंमत : **रू. २१,००,०००/-** बयाणा रक्कम : **रू. २,५०,०००/-** बोली वाढ रक्कम : **रू. ५०,०००/-**	**२८ मार्च, २०२५ रोजी स.११.०० ते दु. १.०० पर्यंत**

विक्रीच्या तपशीलवार अटी शर्तीसांठी, कृपया लिंक https://sarfaesi.auctiontiger.net आणि www.laturbank.co.in चा संदर्भ घ्यावा.
ज्या इच्छुक बोलीदारांना लॉगीन आयडी व पासवर्ड तयार करणे, बोली दस्तावेज सादर करणे, ऑनलाईन आपसांत बोलीचे प्रात्यक्षिक/प्रशिक्षण घेणे इ. बाबत मदत हवी आहे त्यांनी मे.ई-प्रोक्युरमेंट टेक्नॉलॉजीज लिमीटेड, नों. बी-७०४-७०५/-, वॉल स्ट्रीट-२, ओरिएन्ट क्लब समोर, गुजरात कॉलेज जवळ, अहमदाबाद-३८०००६, गुजरात आणि हेल्प लाईन क्र. +९१-०७९६८१३६८८०/ ८३७/८४२, rikin@auctiontiger.net येथे आणि मालमत्तेसंबंधी चौकशीसाठी प्राधिकृत अधिकारी मोबाईल क्र. ०२० - २६९२६०९१/९२, ई-मेल : auction@laturbank.co.in वेबसाईट : www.laturbank.co.in सोमवार ते शनिवार कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा.

SARFAESI चाअधिनियम, 2002 अंतर्गत १५ दिवसांची वैधानिक विक्री सूचना

याद्वारे कर्जदार/जामीनदार सुचित करण्यात येते की, त्यांनी सदर ई-लिलावाच्या दिनांकापर्यंत अद्यावत व्याज व इतर खर्चांसह वर नमूद रकमेचा भरणा करावा, अन्यथा मालमत्तेचा लिलाव करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक राहिल्यास व्याज व खर्चांसह आपल्याकडून वसूल करण्यात येईल.

दिनांक : १२/०३/२०२५
ठिकाण : पुणे

(स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

सही/-
प्राधिकृत अधिकारी
दि लातूर अर्बन को-ऑप.बँक लि.,लातूर

केनरा बैंक Canara Bank — सिंडिकेट Syndicate

वसुली व कायदा विभाग, क्षेत्रिय कार्यालय, पुणे १
प्रिमियम पॉईंट बिल्डींग, ४ था मजला, जंगली महाराज रोड, मॉर्डन हायस्कूल समोर,
शिवाजी नगर, पुणे-४११००५, ईमेल : recropune@canarabank.com, फोन : ०२०-२५५१२११८

ताबा नोटीस (सेक्शन १३(४)) (स्थावर मालमत्तेकरीता)

जसे की, खाली सही करणार **कॅनरा बँकेचे** अधिकृत अधिकारी यांनी त्यांना दि सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२, (२००२ चा ॲक्ट ५४) (येथे 'द ॲक्ट' असा उल्लेख केल्यानुसार) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रुल्स २००२ चा सेक्शन १३(१२) आणि रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन खालील कर्जदार/जामीनदार त्यांच्या नावापुढे नमूद केलेल्या तारखेला मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी खाली नमूद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करावी. कर्जदार/गहाणदार रक्कम परत करण्यास असफल ठरल्याने कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३ (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स् २००२ चा रूल ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन खाली नमूद केलेल्या मालमत्तांचा सदर नमूद तारखेला **ताबा घेतला आहे.**
विशेषकरुन कर्जदार/गहाणदार आणि सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तांसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. असा व्यवहार केल्यास तो **कॅनरा बँक** यांना खालील तक्त्यात नमूद केलेल्या, येणे असलेल्या रकमा आणि त्यावरील व्याज यांच्या अधीन राहील.
सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

अ. क्र.	शाखा/कर्जदार व जामीनदाराचे नाव	गहाण मालमत्तेचा तपशील	येणे रक्कम (रु).	मागणी नोटीसीची तारीख / ताबा घेतल्याची तारीख
१	**कर्जदार : श्री. बाळासाहेब भुजाबा माने**	पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग, फ्लॅट नं. ५०५, ५ वा मजला, क्षेत्रफळ ३६.७७ चौ. मी. बिल्डींग नं. डी-१९ (पी+७ मजले आणि ४२ टेनामेंटस चा समावेश) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरकुल स्कीम म्हणून ओळखली जाणारी स्कीम, पीसीएनटीडीए च्या सेक्टर नं. १७ व १९ या जमीनीवर बांधण्यात आलेली, क्षेत्रफळ २५३०१८.५० चौ.मी., गाव चिखली, तालुका हवेली जिल्हा पुणे येथे स्थित, उप-निबंधक हवेली, पुणे यांच्या अखत्यारित आणि पीसीएनटीडीए आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या हद्दीत . **जमीनीच्या चतु:सीमा : पूर्वे